# यहूदाचे पत्र

Jude | with Study Notes

# यहूदाचे पत्र

## 1

[1] [*]येशू मशीहांचा सेवक[*] व याकोबाचा भाऊ यहूदातर्फे[*], बोलाविलेल्या (पवित्र हाक) त्या सर्व विश्वासींच्या नांवे जे परमेश्वर
पित्याद्वारे पवित्र केलेले[*] आहेत, आणि येशूंसाठी सुरक्षित[*] (राखलेले) असे आहेत; [2] तुम्हां सर्वांना कृपा[*], शांति[*] व प्रेम[*] विपुलपणे
मिळोत. [3] हे प्रियानों, मी त्या मुक्तीविषयी[*] तुम्हांस लिहीण्याचा हरेक प्रयत्न[*] करीत होतो, ज्यांत आपल्या सर्वांचा समावेश आहे,

---

[*]**1:1** यहूदा या शब्दाचा अर्थ आहे, “ज्याचा महिमा (स्तुति) करण्यात आलेला आहे” हे नाव, जुन्या करारातील यहूदा व नव्या करारातील यहूदा या नांवासारखेच होय. नव्या करारात अनेक माणसांची नांवे यहूदा किंवा यहूद (ज्यूड) अशी आहेत. हा यहूदा मात्र, खात्रीने तोच असावा अर्थात येशूंचा अर्धा भाऊ (फक्त एका पालकाचा) म्हणजे ज्याला सावत्र भाऊ म्हणता येईल - मत्त 13:55; योहान 7:3.येशूंच्या मरणापूर्वी व पुनरुत्थानापूर्वी (मेलेल्यांतून जिवंत उठणे), तो येशूंचा विश्वासी नव्हता, त्याने इतर शिष्य व प्रेषितांप्रमाणे त्यापूर्वी येशूंवर विश्वास ठेविला नव्हता, परंतु, येशू मेलेल्यांतून जिवंत उठल्यानंतर मात्र, आपण या यहूदाला विश्वासींसह (विश्वासींमध्ये) पाहतो - प्रेषि 1:14; 1 करिं 9:5.

[*]*“सेवक”*- रोम 1:1.

[*]*“यहूदा”*- याकोब 1:1.

[*]*“पवित्र केलेले”*- प्रेषि 20:32; 26:18; रोम 15:16; 1 करिं 1:2; 6:11; इब्री 10:10,14.

[*]*“सुरक्षित”*- योहान 6:37-40; 10:27-28; 17:11-12; रोम 5:9-10; 8:28-30,35-39; 1 करिं 1:8-9; 1 पेत्र 1:5. “बोलाविलेले” रोम 1:6-7; 8:28,30; 9:24; 1 करिं 1:9; गल 1:6,15; इफि 1:18; फिलि 3:4; 2 थेस्स 2:14; 2 तीम 1:9; 1 पेत्र 2:9; 3:9; 5:10; 2 पेत्र 1:10.

[*]**1:2** *“कृपा”*- रोम 9:15-16; 11:32; 12:1; 15:9; इफि 2:4; तीताला 3:5.विश्वासीं त्यांच्या, दयनीय दशेत व अपराधांमुळे पतित झालेले असे आशाहीन व निराधार होते, साहाय्यक म्हणून जेव्हा त्यांना कोणी नव्हते, तेव्हा त्या नेमक्या समयी परमेश्वराने सर्व विश्वासींना त्यांच्या अजाण, अज्ञानी व अशक्त अवस्थेतच, कृपेने त्यांना बंधनांतून मोकळे केले. परमेश्वराच्या कृपेद्वारेच विश्वासीं वाचविले गेले. परमेश्वराची ही दयाळूपणाची कृति होती, ही कृपा व दया त्या सर्व लोकांसाठीची होती, जे ती मिळवून घेण्याच्याही लायकीचे नव्हते, कारण ते अपराधांमुळे अज्ञान व अजाणपणाने परमेश्वरी कृपेसाठी नालायक ठरले होते व अपात्र होते. पाहा, आजही, आत्ताही परमेश्वराची कृपा आपल्यासाठी उपलब्ध आहे आणि परमेश्वराची हीच कृपा व दया आपल्या शांतीचा पाया आहे.

[*]*“शांति”*- रोम 1:7.याचा अर्थ आहे, मानसिक शांति - ‘मन:शांति’ आणि असे अंत:करण व असे हृदय जे परमेश्वराच्या संपर्कात व संबंधात थेट (प्रत्यक्ष) व सरळ सरळ जुळलेले असते, जे अंत:करण व हृदय ज्यांचे नाते परमेश्वर व विश्वासींसाठी स्वच्छ-नितळ व निर्मल असते - एकमत व शांतीपूर्ण सहजीवनाचे असते.

[*]*“प्रेम”*- परमेश्वरी (च्यासारखे) प्रेम (अगापे- योहान 13:34; रोम 5:5; 1 करिं 13:1’ इफि 3:17.परमेश्वरासारखे प्रेम करणे प्रत्येक विश्वासीला यासाठी शक्य होते, कारण हरेक विश्वासीने कृपा, दया व शांति परमेश्वराकडून मिळवून घेतलेली आहे. परमेश्वरी प्रेम, कृपा, दया व शांति ही सर्वाित्कृष्ट सद्‌गुणें होत - 1 करिं 13:13.या सर्वांचा उगम परमेश्वर आहे, कारण तो स्वत:च प्रेम आहे, म्हणून प्रेमाचा स्त्रोत परमेश्वर आहे - 1 योहान 4:7-8.

[*]**1:3** *“मुक्तीविषयी”*- नोट्स - रोम 1:16.यहूदा याला काहीतरी महान, थोर, महिमापूर्ण बाबींविषयी लिहावयाचे होते, परंतु त्याने या गोष्टीवर अधिक भर दिला नाही, त्याऐवजी आनंद न देणारा व तेवढा न आवडणारा असा, जो विषय होता जो त्याच्या मते जास्त महत्वाचा होता, त्याविषयावर लिहिण्याचा त्याने निश्चय केला, कारण त्याला त्या विशेष विषयाचे महत्व पटवून देणे अधिक महत्वाचे वाटले.

[*]*“प्रयत्न”*- चर्चला त्या बाबीची विशेष निकड भासली, नव्हे चर्चची तशी त्यावेळची मागणीही होती. चर्चला एक प्रचंड भयंकर खतरा (धोका) पुढे दिसत होता, सबंध ख्रिस्ती (समाज) विश्वासींसमोर हा धोका आवासून (तोंड मोठे) गिळण्याच्या बेतात होता. अशा विशिष्ट वेळी परमेश्वराचा आत्मा यहूदाला चर्चला जागृत करून तो धोका टाळण्यासाठी प्रोत्साहन देत होता; यहूदा प्रेरित होत होता, की त्याने चर्चला याविषयी सावध करावे. परमेश्वराचा आत्मा त्याला तसे करण्याविषयी भाग पाडत होता व त्यावर मोठा दबावही टाकत होता. चर्चविषयी यहूदावर पवित्र आत्म्याचे ओझे येत होते की यहूदाने चर्चला सचेत करावे.

म्हणून तुम्हीही त्या विश्वासाकरिता बडच्या आवेगाने (उत्साह) प्रयत्न करीत रहावे, तो विश्वास* नेहमीसाठीचा येशूंच्या लोकांच्या* हवाली (सोपविलेला) केलेला होता*, म्हणून त्याविषयी लिहीणे व विनंती करणे मला नितांत गरजेचे वाटले*. [4] *कारण असे अनेक लोक, जे या गुन्ह्याविषयी आधीपासूनच नेमलेले देखील आहेत ते लपूनछपून* आपल्यात शिरले आहेत. ही माणसें दुष्ट* आहेत आणि इतकेच केवळ नव्हे, तर त्यांनी परमेश्वराची कृपा आपल्या अनियंत्रित वासना व कामातुरपणा यांत पार बदलून टाकली

---

*"*तो विश्वास*"- यहूदाचा अर्थ येथे त्या अनुभवाशी नाहीये जो विश्वासीचा (आपला) आंतरिक वा अंत:करणाशी जुळलेला आहे, परंतु, यहूदाला त्या विश्वासाविषयीची कळकळ व ओझे आहे, जे येशूंद्वारे चर्चला (येशूंचा देह) परमेश्वराने येशूंच्या माध्यमातून (द्वारे) दिलेला आहे. येशू व त्यांचे प्रेषित (शिष्य) सदैव हेच शिकवत राहिले, (शिकविले) की कोणत्या गोष्टीवर (कशावर) आपण विश्वास ठेविला पाहिजे व त्याच विश्वासाच्या आधारावर आपण कसे जीवन जगले (व्यतित) पाहिजे. या दोन गोष्टी अर्थात 'कशावर विश्वास' व 'कशा प्रकारचे जीवन', हाच 'तो विश्वास' म्हणविला जातो - ज्याकडे नीट लक्ष देणे खूप महत्वाचे आहे. प्रिय विश्वासींनो, नुसता योग्य (बरोबर) सिद्धांत (शिकवण) घट्ट पकडून ठेवणे व त्यास बिलगून राहाणे (जरी तेही महत्वाचे आहे), पुरेसे नाहीये, भाऊ-बहिणींनो, त्या सिद्धांतानुसार, येशू व प्रेषितांनी दिलेल्या शिकवणीनुसार, जीवन जगणे हे त्याहूनही अधिक महत्वाचे आहे, 'तसेच' जीवन विश्वासीने जगावे - इफि 4:1; कल 1:10; 1 थेस्स 2:12.यहूदाने या पत्रात फक्त अचूक सिद्धांत, योग्य शिकवण यावर विशेष भर दिलेला नसून, अनुकूल व योग्य वर्तणूक (व्यवहार) आणि योग्य व अचूक शिकवण या 'दोन्हींवर' भर दिलेला आहे. यहूदा त्या चुकेकडे इशारा करतो आहे, त्याविषयी चेतावनी देतो आहे, सावध व सचेत करतो आहे, जी त्याला भयंकर धोक्याची वाटते; म्हणजे विश्वासींचे अपवित्र (अशुद्ध राहणीमान) जीवन जगण्याविषयची चूक, जी चुकीच्या (भेसळ) शिकवणीमुळे व सिद्धांतामुळे येत असते.

*"*येशूंचे लोक*"- (विश्वासी) - रोम 1:7.

*"*नेहमीसाठीचा...होता*"- तो "विश्वास" परमेश्वराने येशूंद्वारे प्रगट केला आहे व म्हणूनच त्यांचे प्रेषित याच 'येशूंच्या विश्वासापायी, संपूर्ण आहेत. यात कशाचीच भर घालण्याची (जोडणे) गरज नाहीच मुळी. यात काही जोडले जाऊ नये व त्यातून काहीही काढले जाऊ नये - तुल अनु 4:2; नीति 30:6; प्रकटी 22:18-19. आता यापुढे, परमेश्वर आणखी कशाही सत्याविषयी कोणतेही प्रकाशन देणार नाहीये. या 'विश्वासाचे सत्य' परमेश्वर कधीही इतर दुसऱ्या सत्याशी जोडणार नाहीये. होय, आणि कोणाद्वारेही व कोठेही तर नाहीच नाही मुळी. यापुढे, यानंतर जर कोणताही नवा सिद्धांत, कोणतीही नवीन शिकवण आढळली, तर ती खात्रीने खोटी व लबाडीने आणि फसवेगिरीने परिपूर्ण आहे, यात शंकाच नसावी. ती शिकवण 100 टक्के खोटी आहेच. पाहा, प्रिय विश्वासी बंधु-भगिनींनो, परमेश्वराने येशूंचे सत्य फक्त विश्वासींवर (आपल्यावर) प्रगट केले. ते सोपविले. कशासाठी? ते सत्य, तो विश्वास राखून ठेवण्यासाठी, त्याचा सराव आपल्या जीवनात करण्यासाठी, त्यानुसारच जगण्यासाठी हा विश्वास जो नेहमीसाठीचा आपणास दिला गेला आहे, त्या विश्वासाचे रक्षण करावयाचे आहे, विरोधक जेव्हा त्यावर आक्रमण करतात, तेव्हा तो विश्वास तसाच कायम टिकवावयाचा आहे, जपावयाचा आहे, त्यात पाय खोलवर रूतवून त्यावर ठामपणे उभे राहावयाचे आहे - तुल 1 करिं 4:1; 1 थेस्स 2:4; 1 तीम 1:11; 6:20; 2 तीम 1:14.

*"*मला...वाटले*"- ग्रीक शब्दानुसार तेथे नेमकी जी स्थिती होती, ती एखाद्या युद्ध-क्षेत्रासारखी होती, जेथे सर्व विश्वासीं, विश्वास-युद्धात लढण्याच्या व झुंज देण्याच्या कार्यात लागलेले असतात - तुल इफि 6:11-18; 1 तीम 6:12. सामान्यत: या पृथ्वीवर व विश्वासी-ख्रिस्ती समाजामध्ये (दुनियेत) एक अशी लढाई चाललेली आहे, जी विशेषकरून परमेश्वराने प्रगट केलेल्या सत्याशी संबंधित व ख्रिस्ती-विश्वासाशी जुळलेली आहे.

***1:4** वचन नीटसे लक्षपूर्वक वाचल्यावर कळते की तो कोणता व कसा धोका (फसवणूक) होता, ज्याविषयी यहूदा चिंता करीत होता. एक महाभयंकर शिकवण ख्रिस्ती लोकांमध्ये शिरत होती. चुकीची शिकवण हळूवारपणे चर्चपुढे मांडली गेली होती. ती फसवी शिकवण अशी होती: उद्धार पूर्णत: परमेश्वरी कृपेमुळेच आहे व तो मनुष्याच्या चांगल्या कार्यांवर कशा प्रकारेही अवलंबून नाहीये, म्हणूनच ख्रिस्ती विश्वासी आपल्या मनमर्जीप्रमाणे, वाटेल तसे जगू शकतो, तो कसाही जगला, त्याने काहीही केले, तरी ही कृपा त्याला क्षमा करेलच, (अनुग्रह त्याला माफ करेल); कारण मुक्ति संपूर्ण प्रकारे परमेश्वर-कार्य आहे, जी अनुग्रह मिळवून देते. तुल - रोम 6:1.ही चुकीची व धोकादायक शिकवण आज देखील अस्तित्वात आहे.

*"*लपूनछपून*"- 2 पेत्र 2:11.बहुधा असे पाहता येते वा आढळते की लबाड शिक्षक उघडपणे व प्रामाणिकपणाने चर्चसमोर येत नसतात. चोरांसारखे ते नकळत शिरतात. पुढे आपली लबाडी व खोटी शिकवण, येशूंच्या सत्यात मिसळून, ती अधिक फसवी करतात.

*"*दुष्ट*"- तोंडाने ते अंगिकार करतात, की ते ख्रिस्ती आहेत, शिष्य आहेत, पण त्यांची वागणूक व जीवन त्यापेक्षा उलटे असते, ते ख्रिस्तांचे अनुयायीही नसतात व खरे विश्वासूही नसतात.

आहे*. आपला 'एकमेव सार्वभौम व मौलिक प्रभु** येशू यांचा ते स्वीकार करीत नाहीत* (नाकारितात). [5]तुम्हांला आधीच व्यवस्थित ठाऊक होते की मिसर देशाच्या गुलामीतून आजाद केलेल्या लोकांपैकी ज्या कोणी परमेश्वरावर विश्वास ठेविला नव्हता, त्या प्रत्येक मनुष्याचा त्याने (प्रभुने)* नाश केला* होता; याच गोष्टीची पुन्हा तुम्हांला आठवण* करून द्यावयाची माझी इच्छा आहे.
[6]ज्या ज्या स्वर्गदूतांनी आपले पहिले पद* सांभाळून (राखून) ठेविले नव्हते व आपले निवासस्थान* सोडले होते; त्या सर्वांना त्याने साखळदंडांनी पक्के बांधून, सदाकाळासाठी भयंकर न्यायाच्या महान दिवसासाठी* निरंतरच्या (अनंत) घोर अंधारात राखून ठेवले आहे. [7]अस्वाभाविक* यौन संबंधात आकंठ (तुडुंब) बुडून, परकीयांच्या देहांच्या मागे लागलेल्या, सदोम, गमोरा व त्यांच्या सभोवतालच्या ज्या ज्या नगरांनी दुष्कृत्यें केली होती, व ज्यांनी कधीही न विझणाऱ्या (अनंत) अग्निदंड* भोगलेला होता*, ती नगरें सर्वांसाठीचा एक नमूना झालेली होती. [8]यौन संबंधांनी लिप्त झालेले हे स्वप्नदर्शी* देखील अगदी त्या प्रकारेच देह अशुद्ध* करितात, अधिकारांचा अपमान* करितात व प्रतिष्ठितांची आणि महान लोकांची निंदा करून त्यांना तुच्छ लेखतात. [9]परंतु, प्रधान

---

* *"परमेश्वराची...टाकली आहे"*- असे वाटते की करिंथातील काही ख्रिस्तींचा अंगिकार असा होता देखील. त्यांचा विचार असाच काहीसा होता - 1 करिं 5:1-2; 6:9,12; तीताला 2:11-14यांत वाचा की परमेश्वराचा अनुग्रह (कृपा) खरोखरीच काय शिकवतो - इफि 4:19-24.

* *"एकमेव...प्रभु"*- ग्रीक शब्द जो येथे आहे, तो म्हणजे 'डेसपाॅटेस' म्हणजे सर्व (अरूख्या) अधिकारांचा स्वामी, अर्थात अधिकारांचा मालक व अधिकारी ज्याच्याकडे शासनाचा सर्वाेपरि अधिकार आहे. लूक 2:28-29व प्रेषि 4:24या पुस्तकांत 'परमेश्वराप्रत समर्पित केलेले' ते समर्पक शीर्षक आहे. ख्रिस्त येशूंच आपले 'एकमेव' सार्वभौम सत्ताधीश आहेत, ज्याचा अर्थ असा की ख्रिस्त येशू परमेश्वर आहेत; या वचनातील शेवटला शब्दसमूह 'एकमेव सार्वभौम - सर्वोपरि प्रभु' येशू आहेत हे पूर्ण प्रकारे स्पष्ट करतो. वरील भाषांतराने ते तंतोतंत - जुळणारे आहे.

* *"आपला...प्रभु"*- तुल 2 पेत्र 1:1.

* *"स्वीकार...नाहीत"*- 2 पेत्र 2:1.अस्वीकार करण्याची कृति एकतर कार्यांद्वारे, नाहीतर शब्दांद्वारे दिसत (होत) असते. ही माणसें ज्यांनी येशूंच्या प्रभूत्वाचा व त्यांच्या स्वाधीन होण्याविषयीचा नकार केला होता, ते कदाचित तोंडाने सपशेल म्हणाले असतील, की येशू त्यांचे प्रभु व स्वामी आहेत, पण जीवनातून सगळे विपरित दिसत होते.

* *"त्याने (प्रभुने)"*- हे शीर्षक होय (ग्रीक-क्युरिआॅस) जे नवीन करारात - सगळीकडे येशूंसाठी उपयोगात आणलेले आहे. आधीच्या वचनांत यहूदाने येशूंना प्रभूही म्हटले आहे. ध्यानपर्वूक पाहा, या वचनात तो स्पष्टपणे म्हणतो आहे की प्रभूने आपले लोक इजिप्तबाहेर (मिसर) काढले, त्यांना वाचविले, त्यांची सुटका केली. ऐतिहासिक रेकाॅर्डमध्ये, इस्त्राएली लोकांना बाहेर काढणारा परमेश्वर यहोवा होता - पाहा निर्ग 3:7-12; 18:10; 19:20याचा अर्थ असा की यहूदा येथे, यहोवाबरोबर येशूंनाही समान पदावर ठेवतो आहे, अर्थात दोघांत फरकच नाहीये. नोट्स - 'प्रभु' - लूक 2:11.

* *"नाश केला"*- इब्री 3:16,19; 1 करिं 10:1-6; गण 14:11,22,23; स्तो 78:22,32,33; 106:15,18,24-26,29.

* **1:5** *"आठवण"*- 2 पेत्र 1:12-15.

* **1:6** *"पहिले पद"*- 2 पेत्र 2:4.

* *"निवासस्थान"*- स्वर्ग

* *"दिवस"*- न्यायाचा महान दिवस - प्रकटी 20:11-15.

* *"अस्वाभाविक"*- उत्प अध्याय 19.

* *"अग्नीचा दंड"*- 2 पेत्र 2:6; मलाखी 4:1; मत्त 3:10,12; 25:41.

* **1:7** *"अस्वाभाविक...भोगलेला होता"*- याचा अर्थ असा वाटतो की, जे अपराध सदोमातील लोकांविषयीचे म्हणून उल्लेखलेले आहेत (जे त्यांनी केले होते), आणि वचन 6 यांतील देवदूतांनी केलेले अपराध, हे दोन्हीं समान (सारखी) होते - तुल उत्प 6:1-4.

* **1:8** *"स्वप्नदर्शी"*- हे लोक वास्तवापासून प्रचंड दूर होते, वास्तवाचा त्यांना स्पर्शही नव्हता. अस्वाभाविक यौन संबंधात ते एवढे गुरफटलेले व लिप्त होते की सच्चेपणा-वास्तविकता-वस्तु स्थिती व खरी गोष्ट कोणती आहे वा कोणती नाही, याचा त्यांना गंधही नव्हता. त्यांचा व्यवहार व वागणे असे होते, जणू काही ते यौन आकर्षणाने मट्ठ व बिनडोक झाले होते. यांना स्वप्नदर्शी म्हटलेले आहे, त्यामुळे कदाचित असे सुचविले जाते आहे, की ही माणसें असा दावाही करीत होती की परमेश्वराने त्यांना प्रकाशन दिले आहे - अनु 13:1-3; यिर्म 23:25-26.

* *"देह अशुद्ध"*- रोम 1:24; 1 करिं 6:18.

* *"अधिकारांचा अपमान"*- प्रतिष्ठित व महान वा स्वर्गीक प्राणी - 2 पेत्र 2:10.

स्वर्गदूत मीखाएलाने[*] जेव्हा मोशेच्या मृत देहाविषयीचा[*] सैतानाबरोबर[*] विवाद केला, तेव्हा त्याने बेज्जती करणारे शब्द
वापरण्याची हिमंत केली नव्हती, परंतु तो एवढेच शब्द बोलला, ‘‘प्रभु तुझ्यावर रागें भरो[*]” (कान उघाडणी-दम देणे). [10] तथापि
एकीकडे मीखाएल व दुसरीकडे हे लोक आहेत; ज्या गोष्टी त्यांना कळत नाहीत, त्या गोष्टींच्या विरोधात ते बोलतात[*]. आणि
बेअक्कल (बुद्धिशून्य) जनावरांसारखेच, ज्या गोष्टी स्वभावतःच कळतात[*] त्याच गोष्टींद्वारे ते नाश पावतात. [11] धिक्कार[*] असो त्या
सर्वांवर, कारण त्या सर्वांनी काइनाची[*] जीवनशैली स्वीकारून आपल्या जीवनात ती लागू केली, स्वतःच्या फायद्याविषयी काही
विचार न करिता बेछूटपणे बलामासारखी चूक[*] केली व कोरहासारखा विद्रोह[*] करून नाश झाले. [12] हे लोक तुमच्या
प्रीतिभोजनामध्ये[*] तुमच्याबरोबर सामील होतात खरे, तरी ते काडीचाही संकोच न बाळगता[*] आपले स्वतःचेच पोट भरणारे[*]
मेंढपाळ (राखणकर्ते) आहेत. ते असे निर्जल मेघ[*] आहेत, ज्यांना वारा वाहून नेतो[*]; जणू ती पानझडीतील फळें न देणारी झाडें[*]

---

[*] **1:9** *“मीखाएल”*- दानी 10:13,21; 12:1; प्रकटी 12:7.प्रधान स्वर्गदूत, स्वर्गदूतांमध्ये सर्वोच्च स्थान (पद) बाळगणारा आहे.

[*] *“मोशेचा मृत देह”*- ही घटना (बाब) बायबलमध्ये नमूद (नोंद) केलेली नाहीये. हा तंटा-वाद नक्की काय व कशाविषयीचा होता, हे आपणास ठाऊक नाही; त्यासंबंधी जाणून घेणे हे देखील आपल्या महत्वाचे व मतलबाचे नाही - अनु 29:29.

[*] *“सैतान”*- नोट्स - मत्त 4:1.

[*] *“प्रभु...भरो”*- सैतानाशी बोलतांना, वार्तालाप करताना सुद्धा मीखाएल किती दक्षता घेत होता आणि काळजीपूर्वक कशी भाषा तो येथे वापरतो, त्याकडे नीट लक्ष द्या. ‘न्याय’, त्याने संपूर्णत: परमेश्वर-प्रभूच्या हाती सोडला, इतरांची निंदा-टिका-दंड ही सर्व कार्ये त्याने प्रभूच्या सुपूर्द केली. आपणही तसेच करू नये का प्रियांनो?

[*] **1:10** *“त्या...बोलतात”*- 2 पेत्र 2:12.यावरून त्यांच्या अंगात, स्वभावात भरलेला दुष्टपणा स्पष्ट दिसतो, ते स्वफुशारकीने, बडया बोलाने व अहंकारात किती गर्विष्ठ झाले आहेत, तेही ठळकपणे दृष्टीस पडते.

[*] *“ज्या...कळतात”*- आतंरिक व आत्म्याशी निगडीत गोष्टींची त्यांना चव नसते, त्याकडे एवढे दुर्लक्ष असते, की त्याविषयी ते शून्य ज्ञान बाळगतात, त्यांना केवळ नी फक्त दैहिक जगिक, शारीरिक गोष्टींत भरपूर रस असतो, म्हणून देहाशी संबंधित गोष्टींची तेवढ्या पुरतीच त्यांना प्रचंड जाण असते.

[*] **1:11** *“धिक्कार”*- यश 3:11; मत्त 18:7.

[*] *“काईन”*- पाहा उत्प 4:1-12.काईनासारखी वर्तन-शैली. काईनाने बलिदानाविषयीचे (अर्पण) जे काही नियम, निर्देश, जे स्वत: याहवे परमेश्वराने आदेशपूर्वक सांगितले होते, नव्हे त्याविषयीची कडक-ठळक आज्ञाच सोडली होती (फर्मान दिला), की त्याला (यहोवा-परमेश्वराला) कसे अर्थात कशा प्रकारे अर्पिलेले बलिदान हवे आहे. साक्षात व प्रत्यक्षपणे परमेश्वराने दिलेल्या फर्मानाकडे काईनाने दुर्लक्ष केले होते, कमी लेखले होते ते तुच्छ समजून दुर्लक्षित केले होते. याबरोबरच परमेश्वर ज्या लोकांचा स्वीकार करतो, त्यांचा तिरस्कारही न करण्याचा आदेश होता, परंतु, काईनाने काय केले? नेमके तेच जे करायचे नव्हते, त्याद्वारे त्याने सरळसरळ परमेश्वराचे आदेश मोडण्याचा व परमेश्वर-स्वीकृताचा तिरस्कार करण्याचा गुन्हा केलेला होता.

[*] *“बलामासारखी चूक”*- पाहा 2 पेत्र 2:15.

[*] *“कोरहासारखा विद्रोह”*- गण अध्या 16. ही परमेश्वरहीन माणसें स्वकर्मांनी, स्वत:वरच नाश ओढवून घेतात. त्याचप्रमाणे कोरहाने परमेश्वराचा विरोध करण्याची घोडचूक केली, प्रत्यक्षपणे त्याने परमेश्वराविरुद्ध बंड करून भयंकर मोठा गुन्हा केला व भयानक नाशही स्वत:कडे खेचून आणला. या वचनात काही विशिष्ट बाबींचे दर्शन घडते, अर्थात परमेश्वरहीन वा परमेश्वर ज्यांच्याबरोबर नाही असे जीवन जगणारे लोक नेमके कसे असतात या वचनाच्या प्रकाशात अशा लोकांच्या हृदयात तीन प्रमुख गोष्टी राज्य करतात - 1 सत्य वा सच्चेपणाविषयीची घृणा, आणि जे कोणी परमेश्वरी सत्याचे जीवनात पालन करून परमेश्वर-भयाने जगत असतात, त्यांचा द्वेष, व त्यांच्याप्रत शत्रूत्वाची भावना, 2 जे काही, जेथूनही मिळेल, अधाशासारखे मिळवीत राहणे, अधिकाधिक प्राप्त करण्याचा मोह, लोभ व हावरटपणा. 3 परमेश्वराविरुद्ध बंडाळी (विद्रोह). त्यांची मने प्रभूच्या निर्देशाचा सतत विरोध करीत असतात.

[*] **1:12** *“प्रेमसभा”*- नोट्स 1 करिं 11:20-22.

[*] *“काडीचाही...बाळगता”*- त्यांचा विवेक त्यांना बोचत नाही, दोषी ठरवीत नाही, त्यांची झोप उडवीत नाही. आपला विवेक त्यांनी असा काही ठार केला आहे, की तो त्यांना ‘जे वाईट तेच सर्वोत्तम असे शिकवतो’, मेलेला हा त्यांचा विवेक परमेश्वराच्या चेतावणींना जणू त्या काहीच नाहीत, फालतू आहेत असा सिग्नल (इशारा) देत असतो - तुल 1 तीम 4:1.

[*] *“स्वत:चेच...भरणारे”*- लालची-लोभी, स्वार्थीपणा - आपलपोटेपणा आणि इतरांप्रत विचार न करणारे, पर्वा न करणारे. या सर्व गोष्टींनी त्यांचे मन खच्चून भरलेले होते, त्यामुळे त्यांची कार्यें सुद्धा याच दुर्गुणांमुळे प्रेरित व त्यावर केंद्रित होती. तुल यहे 34:1-10; यिर्म 10:21; 12:10; 23:1.

[*] *“निर्जल मेघ”*- असे मेघ जे तजेला व आल्हाददायक वर्षावाची खोटी प्रतिज्ञा करतात; त्यांच्याकडून प्रसन्नतेच्या थंडगार

आहेत, जी दोनदां मेलेली* व समूळ उपटलेली* आहेत. 13 हे लोक जणूकाय समुद्राच्या वेगवान लाटा* आहेत, ज्या आपल्या
निर्लज्जपणाचा फेस वर फेकतात*. ते डळमळणारे तारे* आहेत, ज्यांच्यासाठी अनंत अंधार ठरविलेला आहे. 14 *आदामापासूनच्या
सातव्या पिढीतील हनोख याने देखील या दुष्ट लोकांविषयी अशी भविष्यवाणी केली होती, की ''पाहा, प्रभु आपल्या लाखों पवित्र
लोकांबरोबर आला आहे, 15 जेणेकरून, त्याने सर्व दुष्टांचा त्यांच्या दुष्टाईच्या घृणात्मक कार्यांविषयी न्याय करावा; यासाठीही की
ज्या लोकांनी* येशूंविषयी बकवादी गोष्टी म्हटल्या होत्या, त्या सर्वांनाही दोषी ठरवावे". 16 हे सर्व कुरकुर करणारे, असंतुष्ट,
आपल्याठायी असलेल्या वासनांचे गुलाम, गर्वाने फुगून मोठमोठ्या गोष्टी करणारे व स्वतःच्या फायद्यासाठी मखलाशी (चापलूस)
करणारे लोक असे आहेत*. 17 परंतु, माझ्या प्रियांनो, आपले प्रभु येशू ख्रिस्त यांचे जे प्रेषित होते, ज्यांनी आधीच सर्वकाही

---

वातावरणाची (हवामान) अपेक्षा केली जात असते, परंतु, ते कोरडे, भकास व बिनपाण्याचे असतात, म्हणून एकही थेंब पाडण्यास समर्थ नसतात - नीति 25:14.

*"*वाहून नेतो*"- 2 पेत्र 2:17.

*"*फळें न देणारी झाडें*"- उत्तम फळांवाचून. (कारण ती प्रचंड वाईट फळें देण्यास समर्थ असतात). नव्हे, त्यांनी कधीही काहीही केले तरी त्यांना चांगली फळें येणेच नाही - तुल मत्त 21:18-19; लूक 13:6-7.

*"*दोनदां मेलेली*"- गुन्हें, अपराध, दुष्टाई, यांत मेलेली - इफि 2:1.ज्या प्रकारचे जीवन ते जगले, जी शैली त्यांनी पत्करली त्यावरून त्यांचे मरण पक्के (पुष्टि) होते - मरणाकडे नेणारी वाट त्यांनी निवडली, त्यासाठी जसे पाहिजे तसेच जीवन स्वीकारले, म्हणून त्यांचे मरण खात्रीने, शाश्वतीने त्यांच्यावर झेप घालणारच आहे - 1 तीम 5:6.जे सत्य त्यांनी नाकारले होते, त्या सत्याप्रत आतंरिक रीतिने ते मेलेलेच होते. इतकेच नव्हे, तर पुढे ते दुसऱ्या मरणाकडे (च्या दिशेने) चालत जात होते - प्रकटी 20:14.दुसरे मरण जे अस्तित्वात आहे व नंतर येईल, ते त्यांनी स्वत: ओढवून घेतले होते. यहूदा संकेत देतो, की ते त्यांच्या कर्मांचे फळ आहे. उद्दामपणा, बेशर्मी, नि:संकोच, सत्यावरील अविश्वास आणि बंड (विद्रोह) या सर्वांच्या परिणामी त्यांनी घोडचूक केली आहे, अर्थात येशूंद्वारे परमेश्वराने देऊ केलेल्या अनंत जीवनाच्या शक्यतेपासून ते मुकले आहेत. सर्व दुर्गुणांमुळे ती शक्यता लाथाडून त्यांनी स्वत:वर, स्वत:च दुसरे मरण खेचून आणलेले आहे. ते असे वृक्ष होते, जे परमेश्वराद्वारे लाविले गेलेले नव्हतेच मुळी; म्हणून त्यांच्यामध्ये आतंरिक जीवनाचा अभाव होता, कमतरता (उणीव) होती. ते जणू दोनदां मेलेले व समूळ उपटलेल्या वृक्षांसारखे झाले होते; असे आशाहीन की पुढे कधीच त्यांना कशाप्रकारची ही आशा (उम्मेद) बाकी राहूच नये.

*"*समूळ उपटलेली*"- मत्त 15:13.परमेश्वराने ही माणसें (वृक्षें) लावलीच नाहीत. अशा कोणत्याही वस्तूशी किंवा कार्याशी किंवा बाबींशी त्यांचा संपर्क नव्हता की ज्यामधून त्यांच्या जीवनात काहीतरी उत्तम फळ उत्पन्न व्हावे. सच्चे ख्रिस्ती, खरे विश्वासीं जसे असावेत व जसे अपेक्षित आहेत, त्याच्या अगदी उलट ही माणसें होती - ते लोक काहींसे इफि 3:17व कल 2:7प्रमाणे आहेत.

***1:13** *"वेगवान लाटा"*- अस्वस्थ, बेचैन, डळमळणारे, जे आपल्या मनात उसळणाऱ्या अभिलाषांच्या वरखाली जाणाऱ्या वेगवान समुद्राच्या लाटांसारखे आहेत. तुल यश 57:20-21.

*"*आपल्या... वर फेकतात*"- त्यांच्या आत दडलेले अपराध- गुन्हें, अभिलाषा त्यांच्या घृणामय, घाणेरडचा कृतींद्वारे प्रगट होतात

*"*डळमळणारे तारे*"- ताऱ्यांच्या विशिष्ट कक्षा असतात, ख्रिस्ती लोकांची कक्षा, फिरण्याची दिशा व सीमा येशू ख्रिस्तांभोवती असते. येशूंच्या सभोवताली ते आकर्षिलेले असतात. परंतु या दुष्ट माणसांची, येशूंभोवती निर्धारित अशी कोणतीही सीमा नसते (नाही). ख्रिस्ती लोकांसाठीचा जो हेतू आहे, जे लक्ष्य आहे व जे त्यांच्यापुढे येशूंनी ठेविलेले आहे त्याकडे ही माणसें जात नसतात, त्या हेतूची पूर्ति करण्याचा त्यांचा मानस नसतोच - फिलि 3:14. "अंधार" 2 पेत्र 2:17;तुल फिलि 2:15; दानी 12:3.

***1:14-15** उत्प 5:18,21-24. हे वचन बायबलमधून नाही. पाहा, जे वचन हनोख हजारों वर्षांपूर्वी बोलला होता, तेच वचन पुन्हा बोलण्याची प्रेरणा पवित्र आत्म्याने दिली, ("हनोखाचे पुस्तक" नांवाचे एक पुस्तक आहे, परंतु, लक्षात असावे, की ते परमेश्वर प्रेरित पुस्तक नव्हे. त्यात काही विचित्र कथांचा उल्लेख आहे व सिद्ध करता येत नाही वा कोणतेच प्रमाण नाही, की यहूदाने या वचनाचा उपयोग, त्याच पुस्तकातून केलेला असावा). यहूदाने जर हे वचन उपयोगात आणले नसते, तर हनोख एखादा संदेष्टा होता, हे सुद्धा आपणास कळले नसते, जसे की आजही आहे. अनैतिकता, अशुद्धपणा, दुष्टकृत्यें, ही सर्व अधिकाधिक प्रमाणात हनोखाच्या दिवसांतही अस्तित्वात होती, जशी आपल्या दिवसांत आपण पाहतोच आहोत, म्हणूनच तो त्याची तीव्र निंदा करतो.

***1:15** *"ज्या लोकांनी"*- हनोखाची भविष्यवाणी आजच्या युगाच्या लोकांविषयीची होती. "दोषी ठरवावे"- प्रेषि 17:31.

***1:16** *"स्वत:च्या...लोक आहेत"*- ही माणसें भक्तिहीन आहेत म्हणून सरळ मार्गावर चालणारी नाहीत, प्रामाणिकपणा त्यांच्या कोणत्याही व्यवहारात दिसत नाही (नसतो). लोकांना जे ऐकावयास आवडेल, असे त्यांना वाटते, तेच ते त्यांना सांगतात. त्यांचा हेतू, इतरांकडून आपल्याला फायदा कसा मिळविता येईल, लोकांचा उपयोग स्वत:च्या भल्यासाठी कसा करून घेता येईल, हा व केवळ हाच असतो. प्रियांनो, आजच्या दिवसांत या युगात, या दुनियेत दरदिवशी आपण पाहात नाहीये काय? चापलूसी, मखलाशी,

सांगितलेही होते, ती हरेक गोष्ट तुम्ही नीट लक्षात ठेवणे* गरजेचे आहे. [18] त्यांनी तुम्हांला सांगितले होते, ''शेवटल्या दिवसांत, थट्टा
व टिंगल-मस्करी करणारे लोक पुढे येतील; ते आपल्या दुष्टाईने भरलेल्या अभिलाषांनुसार जीवन जगतील (चालतील)". [19] असे
लोक फूट पाडणारे, पवित्र आत्म्यावाचून*, अर्थात पवित्र आत्मा नसणारे व जगिक (सांसारिक) आहेत. [20] *परंतु, माझे
अतिप्रियजनहो, तुम्ही मात्र तुमच्यात असलेल्या परमपवित्र विश्वासात वाढत चला व पवित्र आत्म्यामध्ये* प्रार्थना करीत रहा*,
[21] *आपल्या स्वतःस परमेश्वरासारख्या (परमेश्वरी अनंत- प्रेम) प्रेमामध्ये असू द्या आणि अनंत (सदाकाळचे) जीवनासाठी* मोठ्या
तत्परतेने आपल्या प्रभु येशूंच्या दयेची* वाट पाहात रहा. [22] *जे संशय बाळगतात, त्यांच्याप्रत दयाळू रहा, त्यांच्याविषयी करूणा

---

खोटी स्तुति, तोंडपुजेपणा आज हरेक दिवशी सगळीकडे आपण पाहू शकतो, अनुभवू शकतो - चापलूसीवर - ईयोब 32:21-22; स्तो 12:2-3; नीति 26:28; 28:23; 29:5; रोम 16:18; 1 थेस्स 2:5.

*1:17 *"नीट लक्षात ठेवणे"*- वचन 5; 2 पेत्र 1:12-15.तुल - 2 पेत्र 3:3.

*1:19 *"पवित्र आत्म्यावाचून"*- परमेश्वरावर प्रेम न करणारे, सत्य दुर्लक्षित करणारे, परमेश्वराच्या आत्म्याशी संबंध नसणारे असे हे लोक, जरी दावा करतात की ते ख्रिस्तांचे शिष्य आहेत, तरी ते सच्चे ख्रिस्ती मुळीच नाहीत. रोम 8:9.पाहा, अवलोकन करा, की चर्चमध्येही भक्तीसाठी सर्वच लोकांठायी परमेश्वराचा आत्मा नसतो. पाहा, योहान 14:17; रोम 8:9,16; इफि 4:18.

***1:20** आता या वचनात यहूदा दाखवतो, की येशूंचे शिष्य, खरे भक्त. धर्म-त्याग व लबाड लोकांच्या तावडीत जाण्यापासून, स्वतःला कसे राखू शकतात.

* *"पवित्र आत्म्यामध्ये (त) प्रार्थना करीत राहावे"*- इफि 6:18.

* *"अतिपवित्र...करीत रहा"*- यहूदा स्पष्ट करतो की, विश्वासींनी आमरण कसे विश्वासात कायम - भक्कम राहून स्वतःस पवित्र आत्म्याच्या साहाय्याने अतिपवित्र करीत राहावयाचे आहे व पवित्र आत्म्याच्या साहाय्याने निरंतर प्रार्थना करीत राहून स्वतःचे ख्रिस्ती जीवन बलशाली करीत जावयाचे आहे, कारण जगिक अविश्वासींपासून, विश्वासी आपले रक्षण पवित्र आत्म्यामध्ये राहूनच करू शकेल. तुल प्रेषि 20:32; रोम 15:2; इफि 4:12-13; 1 थेस्स 5:11 -परमेश्वराच्या वचनांचे अध्ययन करणे, आणि हरेक समयी दुनियेत जीवन जगतांना ते आपल्या जीवनात लागू करणे, या दोन महत्वाच्या घटकांनीच विश्वासी आत्मिक जीवनात उन्नति करू शकतो आणि स्वतःस विश्वासाठायी वाढवू शकतो. येशूंच्या प्रत्येक विश्वासी भाऊ/बहिणीचे हे आद्य कर्तव्य आहे; किंबहुना जबाबदारी व एक गंभीर आवश्यकता देखील आहे; ज्याप्रत हरेक विश्वासीने त्याचे हे एक उत्तरदायित्व समजून आपली धाव पूर्ण करावयाची आहे.

***1:21** वचन 1 प्रमाणे येशू नेहमी, म्हणजे अनंतकाळासाठी त्यांच्या विश्वासींना उद्धाराच्या स्थितीतच कायम राखून ठेवतात. यासाठी सुद्धा येशूंच्या विश्वासींनी स्वतःला नेहमी (निरंतर) परमेश्वराच्या स्वर्गीक प्रेमात कायम असायचे आहे, येशूंद्वारे बांधले गेलेले परमेश्वर-प्रेमाचे बंधन नेहमीसाठीचे आहे म्हणून विश्वासींनी त्याप्रत प्रामाणिकपणे गंभीर असावे. प्रियांनो, परमेश्वरी प्रेमात कायम राहण्याची ही क्रिया फक्त नी केवळ एकाच माध्यमातून (साधन) होणे शक्य आहे, ते म्हणजे परमेश्वराच्या पवित्र वचनांप्रत आज्ञाधारक राहण्याची कृति - योहान 14:21,23; 15:9-10.

* *"अनंत जीवन"*- अर्थात सोप्या शब्दांत त्याचा ठळक व स्पष्ट अर्थ असा होय - सरतेशेवटी, अखेरीस त्या अवस्थेत प्रवेश घेण्याची (शिरणे) स्थिती (समय) जी विश्वासींपाशी आधीपासूनच आहे, सुरुवातीस येशूंवर विश्वास ठेवल्याने जे तारण विश्वासींना लाभले होते, त्याच तारणाच्या स्थितीत अनंतकाळासाठीचा त्यांचा समावेश होणे होय - योहान 5:24; तीताला 1:2; 1 पेत्र 1:5.

* *"दयेची"*- कितीही टक्यांनी आपण आज्ञापालन करणारे झालो, व आपल्या स्वतःची स्थिती अर्थात आत्मिक अवस्था अशी ठेवली (जोपासली) की परमेश्वर खात्रीने त्याचे प्रेम आपल्यावर व्यक्त करीलच, तरीही ही गोष्ट (बाब) अगदी वास्तविक रितीने सत्य व चोखपणे सच्ची आहे, की प्रारंभापासून (सुरुवात) शेवटापर्यंत आपला उद्धार फक्त नी फक्त 'परमेश्वराची दया व कृपा' यामुळेच (आधार/अवलंबून) आपल्याला लाभलेला आहे.

***1:22-25** यहूदा विनंती करतो की जे संशय बाळगतात, त्यांची शंका दूर करा; त्यांचा तिरस्कार करू नका, परंतु, त्यांच्यावर दया करा, करूणा दाखवा. त्यांना समजून घ्या आणि त्यांनी विश्वास ठेवावा म्हणून त्यांचे साहाय्य करा. शंका असल्यामुळे काही लोक विश्वास ठेवण्यासाठी संघर्ष करीत आहेत, कोणीतरी ती शंका दूर करावी म्हणून विश्वासींकडे पाहत आहेत, त्यांना विश्वास करायचा आहे म्हणून त्यांची मदत करा. लोकांची परिस्थिती (विश्वास करण्याची) पारखता येण्याइतपत आपण समर्थ असावे; आपल्याला ओळखता यावे की कोणत्या वेळी काय करावे, आणि योग्य समयी तसे कार्य आपल्याद्वारे घडावे. शंकांमुळे ते धडपडत आहेत तशा वेळी त्यांची हिंमत वाढवून, त्यांनी विश्वास करावयासाठी लागणारी कृति करावी. काही अन्य लोक भयंकर- भयानक धोक्यात आहेत, तातडीने त्यांची मदत करणे आवश्यक आहे, नाहीतर ते उद्धारापासून दूर जातील. आशाहीन, तारणावांचून होतील. जर ताबडतोब फुर्ताईने प्रयत्न केला नाही, तर परमेश्वराच्या दंडाच्या अग्नीतून जातील. अशांना विश्वासींनी अनंत दंडाग्नीतून बाहेर

असू द्या. 23 झपाट्याने पुढे जाऊन अनेकांना अग्नीतून खेचून बाहेर काढा व दुसऱ्या इतरांवर दया करा. जे देहाद्वारे डागळलेले
आहेत, त्यांनी दूषित केलेल्या त्यांच्या वस्त्रांचाही तिरस्कार करा, त्यांची घृणा करा. 24 आता जो तुम्हांला ठेचाळण्यापासून राखू
(वाचवू) शकतो व खाली पडू देत नाही, महिमासमयी, तुम्हांला निर्दोष[*] व आपल्या अमर्यादित प्रसन्नावस्थेत उभा करू शकतो[*].
25 एकमेव ज्ञानी[*] परमेश्वराचा, अर्थात आपल्या उद्धारकर्त्याचा महिमा, गौरव व प्रभूत्व आणि अधिकार आपल्या प्रभु येशू मशीहांद्वारे
जसा निरंतरचा (सदासर्वदापासूनचा) आहे, आताही असो व भविष्यकाळी देखील तसाच राहो. होय, असेच होवो.

---

ओढून; ख्रिस्तांकडे आणावयाचे आहे, जेणेकरून तारण मिळवून ते अनंतजीवनाचे भागीदार होतील. काही अन्य लोक असे आहेत ज्यांच्यापासून आपण दूर राहावयाचे आहे, अंतर राखायचे आहे, कारण त्यांच्या अपराधात आपल्याला सामिल व्हावयाचे नाही, त्यांच्याबरोबर अपराधांचे भागीदार व्हावयाचे नाही. आपण विश्वासात दृढ राहिलो तर, इतरांच्या अपराधांत ओढले जाणारच नाही - तुल गल 6:1.आपण अपराध्याप्रत प्रेम दाखवावे, परंतु अपराधाचा द्वेष करावा. वचन 24 यात बायबलचे सर्वश्रेष्ठ काव्य पाहावयास मिळते, अर्थात गीत स्वरुपात - “ठेचाळण्यापासून राखू शकतो वा खाली पडू देत नाही”, होय, प्रियांनो, परमेश्वर या दोन्हींपासून राखू शकण्यास समर्थ व प्रतापी आहे - स्तो 37:23-24; रोम 8:37.

[*] **1:24** *“महिमा ...निर्दोष”*- इफि 1:4; 5:26-27.

[*] *“आपल्या... करू शकतो”*- अनेकानेक दु:खें, क्लेश व अपयशांऐवजी प्रचंड आनंद.

[*] **1:25** *“एकमेव ज्ञानी”*- रोम 11:36; 16:27.